आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री  ८.०५ वाजता

८ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग

- राज्याच्या विकासाला महायुती सरकारच चालना देऊ शकेल, असं ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रचारसभेत प्रतिपादन

- अलिगढ मुस्लिम विद्यापीठ अल्पसंख्याक संस्थेचा दर्जा मिळवण्याबाबत दावा करु शकेल, असा  सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा, पुढच्या निर्णयासाठी सुनावणी नियमित पीठाकडे वर्ग

**आणि**

- भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचाराने वेग घेतला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज महाराष्ट्रात धुळे इथं  जाहीर सभा घेतली. महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्याचं काम केवळ महायुतीचं सरकारच करु शकतं असं त्यांनी सांगितलं. महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार, आदिवासींचे हक्क इत्यादी क्षेत्रात युती सरकारनं राबवलेल्या योजनांचा उल्लेख त्यांनी केला. महाविकास आघाडीनं अनेक विकासप्रकल्पांच्या मार्गात खोडा घातला असा आरोप त्यांनी केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा आपल्या सरकारनं मिळवून दिल्याची आठवण करुन देत त्यांनी डबल इंजिन सरकार निवडून देण्याचं आवाहन मतदारांना केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचंही भाषण यावेळी झालं.

शेतकऱ्यांना पाणीपुरवठा, औद्योगिक विकास, रस्ते आणि पायाभूत सुविधा विकास अशी आश्वासनं त्यांनी दिली. विधानसभा निवडणुकीसाठी मोदींची महाराष्ट्रातली ही पहिलीच प्रचारसभा होती. या जाहीर सभेला केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, मंत्री दादा भुसे, अनिल पाटील, आदी उपस्थित होते.

महायुती सत्तेवर आल्यास किसान सन्मान निधीची रक्कम १२ हजारावरुन १५ हजार करण्याचं आश्वासन मोदी यांनी नाशिक शहरात पंचवटी इथल्या प्रचारसभेत दिलं. महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी आदरांजली वाहिली. जनहितासाठी उज्ज्वला योजना, जलजीवन मिशन, नळाद्वारे घराघरात पिण्याचं पाणी, मोफत अन्नधान्य, पीएम आवास योजनेत घर, कापूस-धान-सोयाबीन पिकांना अधिक हमी दर, दुधाच्या दरात वाढ तसंच शेतकऱ्यांसाठी कांदा निर्यातीवरचे निर्बंध हटवण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचा उल्लेख त्यांनी केला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ, राधाकृष्ण विखे पाटील आदि उपस्थित होते.

**<><><><>**

केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते अमित शहा यांच्या तीन प्रचारसभा आज महाराष्ट्रात झाल्या. केंद्रात पृथ्वीराज चव्हाण, शरद पवार २००४ ते २०१४ या कालावधीत दहा वर्षे सत्तेत असतानाच्या काळात महाराष्ट्राला केवळ १ लाख ९१ हजार कोटी रूपये निधी मिळाला तर, मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात १० लाख १५ हजार ८९० कोटी रूपये निधी मिळाला असल्याचं त्यांनी सातारा इथल्या सभेत सांगितलं.

**<><><><>**

राज्यात आणि देशात महिला सुरक्षित नसून भ्रष्टाचार वाढला आहे, देशात सध्या मोदी यांची हुकूमशाही सुरू आहे, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी

केली. ते आज परभणी जिल्ह्यात सेलू इथं प्रचारसभेत बोलत होते. महविकास आघाडीचं सरकार आल्यावर महिलांना दरमहा तीन हजार रुपये, बसचा मोफत प्रवास, जातनिहाय जनगणना करून ५० टक्के आरक्षणाची मर्यादा काढून आरक्षण, कृषी समृध्दी योजनेत ३ लाखांपर्यंत कर्ज माफी, बेरोजगार तरुणांना ४ हजार रुपये मदत हे निर्णय घेणार असल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

भारतीय जनता पक्ष आदिवासींकडून जल, जंगल, जमीनीवरचा हक्क हिरावून घेत असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी सिमदेगा इथं आयोजित प्रचारसभेत आज ते बोलत होते. झारखंडची निवडणूक म्हणजे इंडिया आघाडीचं भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तत्वज्ञानाविरुद्धचं युद्ध आहे, असं ते म्हणाले. जातनिहाय जनगणना आणि आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर नेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><>**

शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना महायुती सरकारनं भ्रष्टाचार केल्याचा आरोप महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज बुलढाणा इथं केला. महाविकास आघाडीच्या उमेदवार जयश्री शेळके यांच्या प्रचारसभेला ते संबोधित करत होते. महाविकास आघाडीनं गेल्या काही काळात विकासकामं केली. पीकविमा, सोयाबीनला भाव, शेतकऱ्यांना कर्जमाफी, कोरोना काळात औषधं अशी कामं आपल्या सरकारनं केल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

**<><><><>**

महाराष्ट्रात **वाशिम आणि सोलापूर** जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी आज गृहमतदानाला सुरुवात झाली. निवडणूक अधिकारी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन बॅलेट पेपरद्वारे मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत.

**गडचिरोली** जिल्ह्यातल्या अहेरी विधानसभा मतदारसंघात आज नोंदणी केलेल्या सर्व म्हणजे ३८ उमेदवारांनी गृहमतदान केलं.

**अमरावती** जिल्ह्यात १४ नोव्हेंबरपासून गृहमतदानाला सुरुवात होणारअसून धुळे जिल्ह्यात १० नोव्हेंबर रोजी गृहमतदान होणार आहे.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या  भंडारा आणि गोंदिया  जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

भ्रष्टाचार हा असा आजार आहे जो मुळापासून नष्ट झाला पाहिजे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज केंद्रीय दक्षता आयोगाच्या दक्षता जागरूकता सप्ताह २०२४ निमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. थेट लाभ हस्तांतरण योजना, ई मार्केटप्लेस आणि इकॉनॉमिक ऑफेंडर्स ॲक्ट यासारखी अनेक पावलं भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सरकारनं उचलली असल्याचं त्या म्हणाल्या. तक्रारींचा जलद निपटारा व्हावा, यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्याचं केंद्रीय दक्षता आयुक्तांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

केंद्रीय रसायने आणि खते मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आज नवी दिल्लीत वैद्यकीय उपकरण उद्योग बळकटीकरण योजनेचा आरंभ केला. यावेळी रसायने आणि खते राज्यमंत्री अनुप्रिया पटेल आणि औषधनिर्माण सचिव अरुणिश चावला उपस्थित होते. या योजनेमुळे मोठा फायदा होणार असून त्याचा दीर्घकाळ प्रभाव

राहील, असं मत नड्डा यांनी व्यक्त केलं. वैद्यकीय उपकरण क्षेत्रात भारताला स्वावलंबी करण्यासाठी ही योजना महत्त्वाची असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अलिगड मुस्लिम विद्यापीठाला अल्पसंख्यक संस्थेचा दर्जा द्यायला सर्वोच्च न्यायालयाने सहमती  दर्शवली असून १९६७ सालच्या अजीज बाशा विरुद्ध केंद्र सरकार खटल्या प्रकरणातला निर्णय रद्दबातल ठरवला आहे.  सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठाने चार विरुद्ध तीन अशा बहुमताने हा निर्णय घेतला. कायद्याद्वारे स्थापित  झालेली संस्था अल्पसंख्यक असल्याचा दावा करू शकत नाही, असं १९६७ च्या निर्णयात सांगण्यात आलं होतं. तर केवळ या कारणामुळे कुठल्याही संस्थेचा अल्पसंख्यक दर्जा नाकारला जाऊ शकत नाही असं न्यायालयाने आजच्या निर्णयात म्हटलं आहे. संस्थेची स्थापना कुणी केली हे महत्त्वाचं असून कलम ३० नुसार संस्था अल्पसंख्यक दर्जा मिळवण्यावर दावा करू शकते असं न्यायालयाने म्हटलं आहे. अधिक तपशीलाचा तपास करण्यासाठी हे घटना पीठानं हे प्रकरण नियमित खंडपीठाकडे सोपवलं आहे. सात सदस्यीय पीठातल्या सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासह न्यायमूर्ती संजीव खन्ना, जे बी पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांनी निर्णयाच्या बाजूनं तर न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी विरोधात मत दिलं.

**<><><><><>**

कायदे आणि न्याय मंत्रालयाने सध्या अंमलात असलेल्या २०१५ च्या वाणिज्यिक न्यायालये  कायद्यात  सुधारणा करण्याचा निर्णय घेतला  आहे. हा कायदा व्यावसायिक विवादांच्या प्रकरणांचा शीघ्रगतीनं, कार्यक्षमतेनं तसंच वाजवी खर्चात निपटारा करण्याच्या उद्देशानं संमत करण्यात आला होता. पण सरकारनं आता या कायद्यात  सुधारणा करण्याचं ठरवलं असून  त्याकरता सामान्य

नागरीकांकडून सूचना तसंच अभिप्राय मागवले आहेत. संबंधित सूचना ई-मेल द्वारे २२ नोव्हेंबर पर्यंत **ndiac-dla@gov.in** या स्थळावर पाठवाव्यात, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज रात्री डर्बनमध्ये खेळला जात आहे. ... दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररणाचा निर्णय घेतला आहे.

भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सामन्याला सुरूवात होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाला परदेशी भूमीवर उत्तम कामगिरी दाखवण्याची संधी आहे.

या संघानं घरच्या मैदानावर बांग्लादेश विरूद्धची टी-२० मालिका ३-० नं जिंकली होती. सध्या भारतीय संघ टी-२० संघ क्रमवारीत अव्वल स्थानावर तर दक्षिण अफ्रिका सहाव्या स्थानावर आहे.

//0<><><><><>//